# Fair Practice Code For Lenders

रिझर्व्ह बँकेने दिलेल्या निर्देशानुसार वेळोवेळी आपल्या परिपत्रकांद्वारे बँकेने संचालक मंडळाच्या मान्यतेनुसार देणेकऱ्यांसाठी सुधारित फेअर प्रॅक्टिस कोड स्वीकारला आहे. याची ठळक वैशिष्ट्ये अशी आहेत:

1. कर्जासाठी अर्ज:

कर्जाच्या अर्जात, बँक सर्वसमावेशक माहिती प्रदान करेल, ज्यामध्ये शुल्क आणि किंमत यांची माहिती, लागू होणार असल्यास, प्रक्रियेसाठी देय असल्यास, आणि अर्ज न स्वीकारल्यास परत करण्यायोग्य अशा फीची रक्कम, प्रीपेमेंट पर्याय आणि इतर बाबींसह सर्व प्रकारच्या कर्जाच्या व कर्जदारांच्या स्वारस्यावर परिणाम होईल आणि ते सुद्धा सर्व प्रकारच्या कर्जांचे किंवा कर्जदारांनी मागितलेल्या कर्जाची रक्कम विचारात न घेता.

2. कर्जच्या अर्जाची पुढील प्रक्रिया :

a. बँक सर्व कर्जाचे अर्ज स्वीकारताना पोचपावती प्रदान करेल ज्यात पूर्ण प्रक्रियेला किती कालावधी लागेल हे नमूग कार्यात येईल
b. बँक कर्जाच्या अर्जाची पडताळणी करेल आणि अतिरिक्त तपशील / कागदपत्रे आवश्यक असल्यास; ते अर्जदाराकडून मागितले जातील.
c. सर्व प्रकारच्या कर्जांसाठी आणि कोणत्याही मर्यादा न लागू करता, बँकेने विलंब न करता अर्जावर प्रक्रिया करणे अपेक्षित असेल. अर्ज नामंजूर केला गेल्यास त्याची करणे अर्जदाराला एका महिन्याच्या आत लेखी किंवा ईमेलद्वारे बँक द्वारे कळविण्यात येतील.

3. कर्जाच्या अर्जाचे मूल्यमापन आणि अटी व शर्ती

a. बँक हे निश्चित करेल की कर्जाची आवश्यकता आणि कर्जदारांच्या पतयोग्यतेचे योग्य मूल्यांकन होईल. मार्जिन आणि जामिनीच्या अटी बँकेच्या विद्यमान कर्ज धोरणानुसार कर्जदाराबाबत योग्य ती काळजी आणि योग्य कर्जदाराच्या पतयोग्यतेवर आधारित असतील. मूल्यांकनाच्या पद्धतींचे तपशीलवार वर्णन बँकेच्या विविध पॉलिसी / प्रॉडक्ट नोट्समध्ये केले गेले आहे. हे मूल्यांकन सर्व क्रेडिट संबंधित माहिती आणि बँकेने विचारलेल्या किंवा प्राप्त केलेल्या इतर माहितीवर आधारित असेल.

b. बँकद्वारे credit limit व त्यावर लागू होण्याऱ्या अटी व शर्ती कर्जदाराला कळविण्या येतील आणि या अटी व शर्ती पूर्ण पणे समजून घेतल्यावर त्यांची कर्जदाराद्वारे त्यांची स्वीकृती बँकेच्या रेकॉर्डवर ठेवण्यात येईल.

c. बँक सर्व कर्जदारांना कर्जाच्या कार्यानुसार कर्जाच्या कराराची प्रत व करारामध्ये नमूद केलेल्या कागद पात्रांची एक प्रत त्या कागद पात्राची अंमलबजावणी केल्या नंतर कर्जदाराने यासंदर्भात कोणतीही विशिष्ट विनंती केलेली नसतानाही प्रदान करेल.

d. शक्य तितके, क्रेडिट फॅसिलिटीला लागू होणाऱ्या अटी व शर्ती फॅसिलिटी च्या नियमावर आधारित असतील आणि हे संपूर्णपणे बँकेच्या स्वेच्छानिर्णयावर अवलंबून असेल. या मध्ये फॅसिलिटी जसे मजूर झालेल्या

लिमिट पेक्षा जास्त पैसे काढणे, क्रेडिट मंजुरीमध्ये विशेषतः मान्य केलेल्या करणाव्यतिरिक्त इतर कारणासाठी जारी केलेल्या chequeला पास करणे, कर्जदाराचे खाते non - performing एसीत म्हणून वर्गीकृत केल्यावर त्या खात्यातून पैसे काढल्यास नामंजुरी किंवा डीफॉल्टच्या बाबतीत किंवा sanctionच्या अटींचे पालन न केल्यामुळे. क्रेडिट लिमिटचा योग्य आढावा घेतल्याशिवाय व्यवसायमध्ये वाढ इत्यादी कारणामुळे कर्जदारांच्या पुढील गरजा पूर्ण करण्याचे बंधन बँकेवर राहणार नाही.

4. कर्जच्या अर्जाची पुढील प्रक्रिया :

बँक निश्चित करेल की sanctionच्या अटी व शर्तींच्या अनुषंगाने मंजूर केलेल्या कर्जाचे पैसे वेळेवर खात्यात क्रेडिट होतील. व्याजदर, सेवाशुल्क आदींसह अटी व शर्तींमध्ये कोणताही बदल केल्याची नोटीस बँक देईल. बँक हे निश्चित करेल की व्याज दर आणि शुल्कातील बदल केवळ संभाव्यपणेच लागू केले जातील (नियमन / कायद्याने आवश्यक नसल्यास).

5. वितरण नंतर पर्यवेक्षण

a. सुविधेच्या अटींनुसार पेमेंट रद्द करणे / वेगाने करण्याचा निर्णय घेण्यापूर्वी किंवा अतिरिक्त सिक्युरिटीज मागण्यापूर्वी, facilityच्या अटीनुसार किंवा अटींमध्ये नमूद नसल्यास वाजवी कालावधी सह बँक कर्जदारांना पूर्वसूचना देईल (जोपर्यंत जामीन धोक्यात येत नाही).

b. कर्जाची पूर्तता केल्यावर बँक सर्व सिक्युरिटीज कर्जमुक्त करेल जर त्यावर कोणत्याही कायदेशीर अधिकार किंवा दुसऱ्या कुठला देणेकऱ्याचा कर्जदाराविरुद्ध दावा नसेल तर. जर सेट ऑफच्या अधिकाराचा वापर करायचा असेल, तर कर्जदारांना त्याबद्दल 3 नोटिसा दिल्या जातील आणि ज्या कागदपत्रांच्या आधारावर देणेकरी सिक्युरिटीज राखून ठेवील असे कागद पत्र नोटीस बरोबर दिले जातील.

6. सार्वत्रिक

a. कर्जदार खाते हस्तांतरित करण्याची विनंती प्राप्त झाल्यास, कर्जदाराकडून किंवा बँकेकडून, ज्या खात्याचे हस्तांतरण करण्याचा प्रस्ताव ठेवण्याच्या बँकेकडून, संमती किंवा अन्यथा म्हणजे बँकेचा आक्षेप, असल्यास, विनंती प्राप्त झाल्याच्या तारखेपासून 21 दिवसांच्या आत कळवले जाईल.

b. अयोग्य त्रास देणे या पातळीवर बँक कधीही येणार नाही जसे की कर्जदारांना विचित्र वेळी सतत त्रास देणे, कर्जाच्या वसुलीसाठी ताकदीचा वापर करणे इत्यादी

c. बँक कर्ज देण्याच्या बाबतीत लिंग, जात आणि धर्माच्या आधारावर भेदभाव करणार नाही.

d. बँकेच्या कार्यकर्त्यांच्या निर्णयांमुळे निर्माण होणाऱ्या वादांवर बँकेच्या तक्रार निवारण धोरणांतर्गत विहित पद्धतीने सुनावणी होऊन त्या निकाली काढण्यात येतील, अशी योग्य तक्रार निवारण यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.